आधुनिक विचारांचे
वर्तमान

बीड । मंगळवार, २८ सप्टेंबर २०२१ । वर्ष : ३
आपले वृत्तपत्र, आपला आवाज
अंक : ४८ । पाने : ४ । मूल्य २ ₹

मोदी सरकारकडून अजित पवारांवर मोठी जबाबदारी

नवी दिल्ली : वस्तू व सेवा कर प्रणालीतील (जीएसटी) त्रूटी दूर करून ती सहज, सोपी करण्यासंदर्भात सुधारणा सूचविण्यासाठी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली विविध राज्यांच्या उपमुख्यमंत्री व अर्थमंत्र्यांचा मंत्रिगट स्थापन करण्यात आला आहे. मंत्रिगटाने शिफारस केलेल्या आणि जीएसटी परीषदेने मंजूर केलेल्या सुधारणांच्या अंमलबजावणीवर देखील हाच मंत्रिगट देखरेख ठेवणार आहे. केंद्रीय अर्थमंत्रालयाने त्यासंदर्भातील आदेश नुकतेच जारी केले.

लिंगायत वेगळा धर्म नाही, तो हिंदूच

चंद्रशेखर शिवाचार्य माजलगावकर महाराज यांची स्पष्ट भूमिका

▶ बाबा श्रीहरी देशमाने

माजलगाव : लिंगायत आणि वीरशैव एकच असून ते हिंदूच आहेत, अशी स्पष्ट भूमिका सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी मठाचे नूतन मठाधिपती चंद्रशेखर शिवाचार्य माजलगावकर महाराज यांनी 'वर्तमान'शी बोलताना मांडली. मठाधिपती विराजमान झाल्यानंतर प्रथमच प्रिंट मिडीयाला चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी मुलाखत दिली.

'वर्तमान'शी बोलताना चंद्रशेखर शिवाचार्य माजलगावकर महाराज यांनी विविध धार्मिक आणि सामाजिक मुद्यांवर संवाद साधला. महाराज म्हणाले, प्राचीन परंपरा लाभलेल्या सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी मठाचा मठाधिपती झाल्यानंतर वीरशैव लिंगायत समाजाला एकसंघ ठेवण्याबरोबरच इतर जबाबदारी खांद्यावर पडली आहे.

समाजातील विद्यार्थ्यांना धार्मिक पातळीवर शिक्षण देणे काळाची गरज आहे. आज सर्वजण विज्ञान युगात जीवन जगत असलो तरी अध्यात्म हे अधिष्ठान मला महत्त्वाचे वाटते. लिंगैक्य तपोरत्नं प्रभु पंडिताराध्य शिवाचार्य माजलगावकर महाराज यांनी दिलेले विचारांचे धन अनमोल आहे. ते आयुष्यभर पुरेल. गुरूवर्यांच्या विचारानेच आपली पुढील वाटचाल सुरू राहील अशीही माहिती चंद्रशेखर शिवाचार्य माजलगावकर महाराज यांनी दिली. काही विचारप्रवाह लिंगायत धर्माची वेगळी मांडणी करतात यावर भूमिका मांडताना चंद्रशेखर शिवाचार्य महाराज म्हणाले, मूळात लिंगायत आणि वीरशैव हा भेद करणे चुकीचे आहे. लिंगायत आणि वीरशैव एकच असून हिंदूचाच घटक आहे, अशी आपली स्पष्ट भूमिका आहे.

वीरशैव लिंगायत समाज एकसंघ राहण्यासाठी आपण कटिबद्ध आहे. सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी मठातर्फे विविध सामाजिक उपक्रम यापुढेही नेटाने सुरू राहतील, मठाधिपती झाल्यानंतर माझ्यासमोर मोठी आव्हाने आहेत. मात्र प्रत्येक गोष्ट अनुभवाने शिकून समाजाला बरोबर घेवून पुढील वाटचाल करणार आहे, असेही चंद्रशेखर शिवाचार्य महाराज म्हणाले.

मुलांची शिकवणी घेणारे मठाधिपती

सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी मठाचे नूतन मठाधिपती चंद्रशेखर शिवाचार्य माजलगावकर महाराज हे तिरूपती विद्यापीठातून संस्कृत विषयात बी.ए.पदवीधर आहेत. त्यांचा मुलांच्या शिक्षणावर अधिक भर आहे. गेल्या १५ दिवसांपासून चंद्रशेखर शिवाचार्य महाराज हे मठात मुलांची शिकवणी घेत आहेत. मुलांना मराठी आणि संस्कृत विषयाचे ज्ञान मिळावे, यासाठी हा शिकवणी वर्ग सकाळी एक तास आणि संध्याकाळी एक तास घेतला जात आहे, अशी माहिती चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी वर्तमानशी बोलताना दिली.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
☎ 9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३,
मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

फास्टट्रॅकन्यूज

रजनी पाटील यांची राज्यसभेवर बिनविरोध निवड

नवी दिल्ली : काँग्रेसचे राज्यसभा खासदार राजीव सातव यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या जागेवर पोटनिवडणूक होणार आहे. काँग्रेसने रजनी पाटील यांना उमेदवारी दिली. तर भाजपने संजय उपाध्याय यांना उमेदवारी दिली होती. संजय उपाध्याय यांनी उमेदवारी अर्ज भरल्यानंतर भाजपचा विजय होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला होता. मात्र, उपाध्याय यांनी उमेदवारी मागे घेतली आहे. त्यामुळे आता रजनी पाटील यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे.

बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करा : मोहन जगताप

माजलगाव : बीड जिल्ह्यात मागील तीन आठवड्यापासून सुरू असलेल्या धुव्वाधार व सततच्या पावसामुळे माजलगाव, वडवणी व धारूर या तीन तालुक्यांमध्ये कापूस, सोयाबीन, बाजरी यांच्यासह फळपिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. या आस्मानी संकटातुन शेतकऱ्यांना सावरण्यासाठी प्रशासनाने बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा. शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रूपये मदत द्यावी, अशी मागणी भाजपा नेते तथा छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष मोहन जगताप यांनी शासनाकडे केली आहे.

भारतबंदला प्रतिसाद

माजलगाव : अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रूपये नुकसान-भरपाई द्या, २०२० चा पीक विमा तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करा यासह विविध मागण्यांसाठी डाव्या पक्षांनी पुकारलेल्या भारत बंदला पाठिंबा देण्यासाठी माकपाचे नेते कॉ.मुसद्दीक बाबा, शेकापचे नेते भाई अॅड.नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले.

वर्तमान
प्रतिबिंब
रहा ऑनलाईन कनेक्ट..
www.vartmannews.in
या वेबसाईटला भेट द्या !

पावसाचा कहर!

नद्यांना महापूर; पीके पाण्याखाली, अनेक गावांचा संपर्क तुटला

▶ प्रतिनिधी

बीड : जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाने कहर केला असून सर्वत्र नद्यांना महापूर आले आहेत. सोमवारी दिवसभर आणि रात्रीह पडलेल्या मुसळधार पावसाने पीके पाण्याखाली गेली आहेत. तर माजलगाव तालुक्यातील अनेक गावांना संपर्क तुटला आहे. दरम्यान, नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

मागील तीन आठवड्यांपासून माजलगाव धरणातून सिंदफणा नदी पात्रात पाण्याचा मोठा विसर्ग सुरू आहे. यामुळे सांडस चिंचोलीचा दुसऱ्यांदा संपर्क तुटला आहे आणि गावात पाणी शिरले आहे. आता पैठणचे धरणदेखील भरत आल्याने या धरणातून केव्हाही पाणी सुटू शकते. यामुळे सिंदफणा व गोदावरी नदीपात्र शेजारच्या २२ गावांतील नागरिकांची झोप उडाली आहे. माजलगाव धरणातून नदीपात्रात मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे. तर पैठणचे धरणदेखील लवकरच भरण्याची शक्यता निर्माण झाल्याने सिंदफणा नदीपात्रात लगतच्या गावासह गोदावरी नदीपात्राकडेच्या गावांना सतर्कतेचा इशारा प्रशासनाच्या वतीने दिला आहे, अशी माहिती प्रभारी तहसीलदार अशोक भंडारे यांनी दिली.

माजलगाव धरणाचे पुन्हा ११ दरवाजे उघडले

माजलगाव : तालुक्यासह धरण क्षेत्रात जोरदार पाऊस पडत असल्याने रविवारी सकाळपासून धरणात पाण्याची मोठी आवक सुरू झाली. त्यामुळे दुसऱ्यांदा सांडस चिंचोलीचा संपर्क तुटला असून अनेक गावांमध्ये पाणी शिरले आहे. दरम्यान, रविवारपासून धरणाचे ११ दरवाजे उघडण्यात आले आहेत. या दरवाजांद्वारे सोमवारी ३१ हजार ४२३ क्युसेक पाणी सिंदफणा नदीपात्रात सोडण्यात आले. यामुळे तालुक्यातील सांडस चिंचोलीचा सकाळपासून संपर्क तुटला असून गावात जाणाऱ्या फुलावर १० फुटांपेक्षा जास्त पाणी होते. तसेच गोविंदपूर, ढेपेगाव व लुखेगावात पाणी शिरले आहे. यावर प्रशासनाचे लक्ष असल्याचे प्रभारी तहसीलदार अशोक भंडारे यांनी सांगितले.

राजकारणात रस; मात्र अद्याप निर्णय झालेला नाही

पल्लवी सोळंके यांचे सूतोवाच

▶ विशेष प्रतिनिधी

माजलगाव : आपला गावभेट दौरा कोणत्याही राजकीय हेतूने नसून लोकांच्या अडीअडचणी समजून घेण्यासाठी हा संवाद दौरा आहे, अशी प्रतिक्रिया 'वर्तमान'शी बोलताना पल्लवी विरेंद्र सोळंके यांनी सोमवारी दिली. दरम्यान, राजकारणात रस आहे, मात्र कोणती निवडणूक लढवणार याबाबत काही निर्णय झाला नसल्याचे सूतोवाच पल्लवी सोळंके यांनी दिले.

पल्लवी सोळंके सध्या गावभेट दौऱ्याच्या निमित्ताने राजकीय वर्तुळात चर्चेच्या विषय बनल्या आहेत. यावर भाष्य करताना पल्लवी सोळंके म्हणाल्या, आपण गावभेट दौऱ्यात गंगामसला सर्कलमधील २० गावांना भेटी दिल्या गावकऱ्यांशी संवाद साधला. जनतेचा प्रतिसाद पाहून सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्यांना हुरूप येतो. माजलगाव मतदारसंघात आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी विविध विकास कामे केली आहेत. मात्र ही कामे शंभर टक्के झाली, असा समज नाही. लोकप्रतिनिधी म्हणून आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्यापर्यंत तळागाळातील दुर्लक्षित घटकांचे प्रश्न मांडण्यासाठी आपण विविध गावांत ग्रामस्थांशी संवाद साधत आहे. राजकारणात रस आहे, मात्र कोणती निवडणूक लढवणार याबाबत अद्याप कोणताही निर्णय झाला नसल्याचे सूतोवाच पल्लवी सोळंके यांनी केले.

मा.रजनीताई अशोकराव पाटील साहेब
यांची राज्यसभेच्या खासदार
म्हणून बिनविरोध निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन!
::: शुभेच्छुक :::
सौ.सिमा नारायण होके पाटील
नगरसेविका, माजलगाव

'गो बॅक ॲमेझॉन'चा लढा अधिक तीव्र करणार

कॅटचे नवनियुक्त माजलगाव तालुकाध्यक्ष संजय सोळंके यांची माहिती

▶ भगीरथ तोडकरी

माजलगाव : अनेक विदेशी कंपन्या देशात पाय रोवत आहेत, त्यामुळे भारतीय बाजारपेठेला मोठा फटका बसत आहे. 'गो बॅक ॲमेझॉन'चा लढा अधिक तीव्र करणार असल्याची माहिती कॅट अर्थात कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सचे नवनियुक्त माजलगाव तालुकाध्यक्ष संजय सोळंके यांनी वर्तमानशी दिली.

देशपातळीवर कार्यरत असलेल्या कॅट अर्थात कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सचे माजलगाव तालुकाध्यक्ष संजय सोळंके वर्तमानशी साधलेल्या संवादात म्हणाले, विदेशी कंपन्या भारतात मोठ्या प्रमाणात विस्तार करत आहेत. हा धोका वेळीच भारतीय व्यापाऱ्यांनी लक्षात घेणे गरजेचे आहे. कॅटच्या माध्यमातून देशव्यापी ॲमेझॉनच्या विरोधात लढा लढला जात आहे. तो केवळ ॲमेझॉनच नव्हे तर इतरही विदेशी कंपन्यांच्या विरोधात लढा लढला जात आहे. ॲमेझॉन सारख्या विदेशी कंपन्या सर्रास भारतीय कायद्याचे उल्लंघन करत आहेत. याकडे कॅटने भारत सरकारचे लक्ष वेधले आहे. गेली २५ वर्ष कॅट संपूर्ण देशात प्रभावीपणे काम कार्यरत आहे. व्यापाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने तीव्र लढे लढून सरकारला व्यापाऱ्यांच्या न्यायहक्कांची जाणीव करून दिली. पूर्वी मराठवाडा विभागीय स्तरावर कॅटचे काम होते. आता जिल्हा पातळीचे तालुका स्तरावरही कॅटचा विस्तार होत आहे. कॅटचे बीड जिल्हाध्यक्ष संतोष सोहनी, महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष तथा बीड जिल्ह्याचे कार्याध्यक्ष विनोद पिंगळे यांच्या कुशल नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात दिशादर्शक काम सुरू झाले आहे. तालुकाध्यक्ष या नात्याने तळागाळातील व्यापाऱ्यांपर्यंत कॅटचे काम घेवून जाणार आहे, अशीही ग्वाही संजय सोळंके यांनी दिली. आज संगणकीय युगातही काही व्यापारी आपल्या न्यायहक्कांबाबत उदासीन आहेत. त्यांच्यात जनजागृती करण्याचे कामही कॅट करणार आहे. लवकरच ॲमेझॉनच्या विरोधात उग्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही संजय सोळंके यांनी दिला आहे.

लोकांच्या हितासाठी लढणारा लोकदूत

मूळ सादोळा येथील रहिवाशी असलेले संजय सोळंके सामाजिक कार्यातही अग्रेसर असतात. किराणा असोसिएशनचे माजलगाव तालुकाध्यक्ष असलेले संजय सोळंके कोरोना लढ्यातही सामाजिक बांधीलकी जपत कार्यरत राहिले. गरजूंना मास्क, सॅनिटाईजरचे मोफत वाटप करून कोरोना लढ्यात व्यापक जनजागृती केली. दरवर्षी जनसामान्यांसाठी पाणपोई उभारतात. आपल्या वाढदिवसानिमित्त गरीब आणि कुटुंबियांना मोफत जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करतात. समाजकारणात अग्रेसर असलेले संजय सोळंके खऱ्या अर्थाने लोकांसाठी लढणारे लोकदूत आहेत, अशा प्रतिक्रिया व्यापाऱ्यांमधून उमटत आहेत.

संपादकीय

पती-पत्नी संसाररूपी रथाची दोन चाके

पती-पत्नी संसाररूपी रथाची दोन चाके आहेत. एक चाक कमकुवत असेल तर अडथळा येतो. त्यामुळे दोन्ही चाके समान पातळीवर असणे गरजेचे आहे. अनेक ठिकाणी मुलीच्या माहेरच्यांनी महिलांच्या बाळंतपणासाठी, त्या दरम्यान दवाखाना, औषधोपचार यासाठी केलेला खर्च सुद्धा आता पतीने परत करावा, अशी मागणी महिला करतात. कधी माहेरच्यांनी पतीला काही आर्थिक मदत केली असेल त्याचा हिशेब देखील मांडला जातो आणि वैवाहिक आयुष्य' हे व्यावहारिक आयुष्य' असे समीकरण तयार होते. पतीचे घर सोडून आपण चूक केली का प्रापंचिक आयुष्यातील छोट्या-छोट्या समस्या सासरीच राहून सोडवता आल्या असत्या का? आपल्या हट्टापायी आपल्या मुलांनाही त्यांच्या हक्क आणि अधिकारांपासून, वडिलांच्या प्रेमापासून वंचित ठेवत आहोत का? या प्रश्नांवर आत्मपरीक्षण करण्याऐवजी महिला स्वतःची कमकुवत वैचारिक शक्ती वापरताना दिसतात. पतीमार्फत आपल्याला हवे तसे आर्थिक लाभ अद्याप मिळाले नाहीत, जसजसा कालावधी जातोय, तसतशी अडचणीत वाढ होतेय, यातून महिला अजून उद्विग्न होतात. आता आपला हेतू साध्य करण्यासाठी, आपण टाकलेल्या केसेस अधिकाधिक स्ट्राँग करण्यासाठी, लवकरात लवकर जास्तीत जास्त आर्थिक लाभ तसेच फारकत मिळण्यासाठी खोट्या आरोपांचा आधार देखील घेतला जातो. वास्तविक ज्या भांडणामुळे, वादामुळे आपण घर सोडण्याचा निर्णय घेतला होता, ते खरंच तितके गंभीर होते का? लग्न झाल्यापासून ते घर सोडण्यापर्यंत जर आपल्याला इतका प्रचंड त्रास त्या ठिकाणी होता, तर आपण तिथेच आपल्या मुलांसोबत इतकी वर्ष कसं नांदू शकलो? आपण आज पतीवर ज्या केस टाकतो आहोत त्यात सत्यता किती आहे? ती व्यक्ती इतकीच वाईट होती, तर तिच्यासोबत आपण काही काळ का होईना संसार कसा केला? यावर विचार केला जात नाही. एकत्र राहत असताना काही चांगल्या घटना, सुख, समाधान, शांती, हौसमौज, आनंद, मानसन्मान याचा देखील आपण उपभोग घेतला आहे, हे महिला सपशेल विसरून जातात. वेळप्रसंगी मुलांवर देखील दबाव टाकून त्यांना खोट्या आरोपांचे साक्षीदार बनवायला महिला तयार होतात. या स्वरूपाचे सर्व प्रयत्न करून देखील महिलांच्या हाताला म्हणावा तसा आर्थिक फायदा काही लागत नाही. ज्या पद्धतीने महिलांनी अनेक माध्यमातून कायदेशीर सल्ले घेतलेले असतात तसेच पतीने देखील स्वतःची बाजू स्ट्राँग करण्यासाठी, कमीत कमी रकमेतून आर्थिक तडजोड करण्यासाठी आणि फारकत मिळण्यासाठी मार्गदर्शन घेतलेले असते. पत्नीने घर सोडल्यापासून तिच्या हितचिंतकांच्या मदतीने केलेल्या विविध उपद्व्यापांमुळे सांसारिक आयुष्य पुन्हा पूर्ववत होण्याची शक्यता देखील नगण्य झालेली असते. अशा वेळी पत्नी कितीही असहाय झाली, माफी मागून, सर्व तक्रारी मागे घेऊन पुनःश्च सासरी यायला तयार झाली, तरी ते सहजासहजी शक्य होत नाही. सगळ्याच ठिकाणी नवरा आणि त्याच्या घरचे पुनःश्च अशा पद्धतीने वागलेल्या स्त्रीची पत्नी म्हणून जोखीम घेणे टाळतात. पती स्वतःच्या इभ्रतीला लागलेला धक्का, त्याच्या घरच्यांना झालेला मन:स्ताप विसरून पत्नीला स्वीकारेलच याची कोणतीही शाश्वती नसते. दोघांच्या या अहंकारामुळे बऱ्यापैकी सुरू असलेला संसार पूर्णच विस्कटून जातो. मुलांना त्यांच्या आई-वडिलांमध्ये का आणि काय सुरू आहे, कोण चूक, कोण बरोबर आहे याचा मागमूस देखील नसतो, तरी ते बिचारे दोन्हीकडून बोलणी खात राहतात. मुलांना आई-वडील दोघेही सारखेच प्रिय असतात. आपण कोणाजवळ राहावे? आई आणि बाप यामध्ये कोणाला निवडावे? या गोंधळात मुलांचं मानसिक खच्चीकरण होते. मुलांना आई-वडील दोघांच्याही एकत्रित प्रेमाची आवश्यकता असते. मुलांनी कोणाची बाजू घ्यावी, काय निर्णय घ्यावा या चक्रव्यूहात आपणच त्यांना फसवतो. त्यातून मूल कोणा एकाकडून बोलली की, दुसऱ्याला वाटते मुलांचे कान भरलेत, मुलांना आपल्याविरुद्ध भडकावण्यात आले आहे. आई-वडील दोघांचेही मुलांप्रती समान कर्तव्य असते. पण मुलं आईसोबत निघून गेली म्हणून वडिलांच्या मनात त्यांच्याबद्दल पण राग आणि कटुता निर्माण होऊ शकते. या सर्व प्रकरणात मुलांचे मानसिक, शारीरिक, शैक्षणिक सर्वच प्रकारे नुकसान होऊ शकते, याचा पती आणि पत्नी दोघांनीही कोणताही आततायी निर्णय घेण्याआधी विचार करावा. स्वतःच्या वडिलांकडे आर्थिक साहाय्य मागण्यासाठी त्यांना पण आपण कोर्ट, कायदा, कलम याची ओळख नको त्या वयात करून देणे खरंच आवश्यक आहे का? केवळ खोटा अहंकार कुरवाळत बसण्यात आपण आयुष्यात खूप काही गमावत आहोत का? याचा विचार होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे महिलांनी कोणत्याही वैवाहिक समस्येमुळे पतीचे घर सोडताना फक्त राग, वैताग, अपमान, संताप या गोष्टींचा आधार न घेता सर्व बाजूंनी सखोल विचार करून, जाणकार व्यक्तीसोबत सल्लामसलत करूनच पुढचे पाऊल उचलावे.

आपल्याला न्याय मिळवून देण्यासाठी कायदा-सुव्यवस्था नक्कीच अस्तित्वात आहे, खास महिलांसाठी अनेक सुधारित कायदे अस्तित्वात आहेतच; परंतु वैवाहिक आयुष्यातील त्रास आणि समस्येबाबतीत कायद्याचा आधार घेताना आपल्याला त्यातील अभ्यासू आणि सकारात्मक मार्गदर्शन करणारी विश्वासू व्यक्ती लाभणे खूप आवश्यक असते. पतीचे घर सोडून लांब राहण्याचा, कायद्याने आर्थिक मोबदला अथवा हक्क मिळण्याचा सल्ला, पोलिसांत तक्रार करण्याचा सल्ला कोणताही अनुभव पाठीशी नसलेले नातेवाईक, मित्र-मैत्रिणी अथवा आई-वडील महिलेला देत असतील तरी केवळ ऐकीव माहितीच्या आधारे आपल्या आयुष्यातील असा कोणताही महत्त्वाचा निर्णय घेणे योग्य नाही. आपल्या स्वतःच्या केसमध्ये एकंदरीत परिस्थितीला, आपल्याला होणाऱ्या त्रासाला, आपल्यासमोर असलेल्या समस्येला खरंच नेमकी कोणती कायदेशीर प्रक्रिया कितपत प्रभावी ठरू शकेल, याची शहानिशा करणे आवश्यक आहे.

युपीत प्रियांकास्त्र चालेल काय?

उत्तर प्रदेशच्या निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाने प्रियांका गांधी यांचा चेहरा पुढे केला आहे. पण इंदिरा गांधी यांच्यापेक्षा विषम परिस्थिती प्रियांका यांच्यापुढे आहे. देशातल्या राजकीय अवकाशात काँग्रेस पक्षाचा प्रभाव अत्यंत क्षीण झालाय. या परिस्थितीत प्रियांका यांच्या रूपाने काँग्रेसने टाकलेला डाव काय करू शकतो याची उत्सुकता असेल.

आज-काल

रशीद किडवई

आकारमानाच्या दृष्टीने देशातलं सर्वात मोठं राज्य असणाऱ्या उत्तर प्रदेशात सध्या विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी रंगू लागलीय. काँग्रेस पक्षाने या निवडणुकांसाठी प्रियांका गांधी यांचा चेहरा पुढे केला आहे. त्यामुळे ही निवडणूक अधिक लक्षवेधी ठरणार आहे. प्रियांका गांधी यांना समजून घेण्यासाठी आपल्याला इंदिरा गांधी यांचं राजकारण समजून घ्यावं लागेल.

इंदिराजींपेक्षा विषम परिस्थिती

इंदिरा गांधी यांनी हळूहळू काँग्रेस पक्षावर आपली पकड मजबूत केली होती. यासाठी त्यांना बराच काळ लागला होता. त्या १९५९ मधे जवाहरलाल नेहरू यांच्या छत्राखाली काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा बनल्या आणि जवळपास एक वर्ष त्यांनी हा कार्यभार सांभाळला होता. लालबहादूर शास्त्री पंतप्रधान बनल्यानंतर इंदिरा गांधी माहिती-प्रसारण खात्याच्या मंत्री बनल्या होत्या. त्यांच्यात आणि शास्त्रीजींमधे सुप्त संघर्षही पाहायला मिळाला. १९७१ मधे बांगलादेशाचं मिशन पूर्ण झाल्यानंतर इंदिराजींचं पक्षातलं वजन कमालीचं वाढलं. या संपूर्ण काळात त्यांना अनेक आव्हानांचा आणि संघर्षाचा सामना करावा लागला. तशाच प्रकारे प्रियांका गांधीही संघर्ष आणि आव्हानांपासून फारकत न घेण्याच्या किंवा पाठ न फिरवण्याच्या भूमिकेत दिसतात. तसं पाहिलं तर इंदिराजींपेक्षाही विषम परिस्थिती आज प्रियांका यांच्यासमोर आहे. कारण देशातल्या राजकीय अवकाशात काँग्रेस पक्षाची छटा कमालीची फिकट झाली आहे. अशा परिस्थितीत प्रियांका यांनी काँग्रेसला सावरण्यासाठीचा जणू विडा उचलला आहे.

तर काँग्रेस किंगमेकरच्या भूमिकेत

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार काँग्रेस पक्षातल्या वरिष्ठ नेत्यांनी त्यांना उत्तर प्रदेश सोडून पंजाब आणि उत्तराखंड या राज्यांच्या प्रभारी बनण्याचा प्रस्ताव मांडला होता. जेणेकरून फेब्रुवारी २०२२ मधे उत्तर प्रदेशच्या बरोबरीने विधानसभेच्या निवडणुका होत असलेल्या या राज्यातल्या विजयाचं श्रेय प्रियांका यांना देता येईल; पण प्रियांकांनी तो प्रस्ताव फेटाळून लावला. त्यांचं असं म्हणणं आहे की, काँग्रेस पक्षाला पूर्वीचा सुवर्णकाळ पुन्हा मिळवून द्यायचा असेल तर उत्तर प्रदेश, बिहार राज्यांमधे पक्षाचा पाया भक्कम झाला पाहिजे. तामिळनाडू, पश्चिम बंगाल या राज्यांमधे द्रमुक आणि तृणमूल काँग्रेस हे काँग्रेसचे अघोषित सहकारी पक्ष सत्तेमधे आहेत. अशा परिस्थितीत उत्तर प्रदेशात त्यांनी सुमारे १०० जागांवर आपलं लक्ष केंद्रित केलंय. काँग्रेसचा जनाधार असणाऱ्या या जागा असल्या तरी गेल्या काही निवडणुकांमधे जिथं काँग्रेस दुसऱ्या-तिसऱ्या स्थानावर गेला आहे. आतापासून या मतदारसंघांमधे पक्षविस्तारासाठी, पक्षाची भूमिका-विचार लोकांपर्यंत पोचवण्यासाठी, लोकसंपर्क वाढवण्यासाठी प्रयत्न केले तर कदाचित २०२२ च्या किंवा २०२७ च्या निवडणुकांमधे काँग्रेस पक्षाची स्थिती निश्चितपणे सुधारलेली असेल, असा त्यांचा कयास आहे. काँग्रेस पक्षातल्या काहींच्या मते, उत्तर प्रदेशात भारतीय जनता पक्षाला पूर्ण बहुमत मिळणार नाही. तसं झाल्यास काँग्रेसकडे जर २५ जागा जरी असतील तरी आपला पक्ष किंगमेकरच्या भूमिकेत जाऊ शकतो. प्रियांका गांधींना मैदानात उतरवण्यामागे हादेखील एक विचार असल्याचं दिसतं.

प्रियांका गांधींकडे व्यवहार्यपणा

प्रियांका गांधी या पहिल्यांदाच निवडणुकांच्या मैदानात उतरत नाहीयेत. यापूर्वीही अनेकदा काँग्रेस पक्षाने त्यांचं कार्ड वापरून पाहिलंय. प्रियांका गांधी यांचं व्यक्तिमत्त्व लोकांना आकर्षक वाटतं. त्यांची संवादशैली कार्यकर्त्यांना, तळागाळातल्या महिलांना, लोकांना भावणारी आहे. प्रियांका नेहमीच आपली भूमिका व्यवहार्य पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न करत असतात. काँग्रेस पक्षातल्या नेत्या-कार्यकर्त्यांमधे किंवा राजकारणाचे अनेक उन्हाळे-पावसाळे पाहिलेला एक गट असा आहे, जो राहुल गांधींपेक्षा प्रियांका गांधींना अधिक पसंती दर्शवतो. याचा अर्थ राहुल यांच्याविषयी त्यांच्यात नकारात्मक भावना आहेत असं नाही; पण प्रश्नांची हाताळणी करण्यात प्रियांका यांच्याकडे जो व्यवहार्यपणा आहे, तो पक्षातल्या अनेकांना महत्त्वाचा वाटतो.

काँग्रेसच्या क्रायसिस मॅनेजर

पंजाबमधे प्रियांकांनी ज्या पद्धतीने नवज्योतसिंग सिद्धू यांना ताकद दिली आणि कॅप्टन अमरजित सिंग यांच्याशी जोडी जमवून दिली ती गोष्ट अनेकांना आश्चर्यचकित करून गेली. राजस्थानमधे अशोक गेहलोत आणि सचिन पायलट यांच्यात जो सुप्त संघर्ष सुरू आहे तो शमवण्यासाठीही प्रियांका जोमाने आणि कसून प्रयत्न करत आहेत. छत्तीसगडमधल्या राजकारणातही त्यांची भूमिका मोठी राहिली आहे. असं असलं तरी प्रियांका गांधी यांच्या काही मर्यादाही आहेत. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या पूर्ण वेळ किंवा चोवीस तास राजकारणी नाहीत. त्यांच्यावर कौटुंबिक जबाबदाऱ्या आहेत. तसंच काँग्रेस पक्षातला अंतर्गत संघर्ष निवळण्यासाठीची भूमिकाही त्यांना पार पाडावी लागते. आजवर ही भूमिका अहमद पटेल बजावत होते.

रॉबर्ट वधेरांवरून टार्गेट?

काँग्रेसच्या कोणत्याही संकटाच्या काळात अलीकडे प्रियांका या क्रायसिस मॅनेजर म्हणून पुढे येताना दिसतात. राहुल गांधी यांच्यात काही अंशी व्यवहार्यपणाची कमतरता आहे. बरेचदा ते हटवादी किंवा साधकबाधक विचार न करता निर्णय घेतात. काँग्रेसजनांच्या अपेक्षांनुरूप त्यांची कार्यशैली नाही असं म्हटलं जातं. काँग्रेसने उत्तर प्रदेशात प्रियांकांचा चेहरा पुढे केला तर भारतीय जनता पक्षाची रणनीती काय असेल हे पाहणं रंजक ठरेल. कारण भाजपच्या भात्यात प्रियांकांचा रथ रोखण्यासाठी रॉबर्ट वधेरांच्या मुद्द्यासारखे काही मुद्दे जरूर आहेत. पण प्रियांका यांनी सुरवातीपासूनच वधेरांच्या विषयावर बोलण्याबाबत भीड ठेवलेली नाही. त्या आपली भूमिका ठामपणे मांडताना दिसतात. न्यायालयामधे वधेरा यांच्या प्रकरणाची सुनावणी असते तेव्हाही त्या सोबत जाताना दिसतात. मुळात भारतीय राजकारणाचा विचार करता वधेरांवरच्या भ्रष्टाचाराच्या आरोपांचा मुद्दा प्रियांका गांधींसाठी अडसर ठरेल असं वाटत नाही. वधेरांवर लावण्यात आलेले आरोप अद्याप सिद्ध झालेले नाहीत. त्यामुळे प्रियांका गांधी या उत्तर प्रदेशात योगी सरकारपुढे आव्हान उभं करू शकतील असं दिसतं. कारण त्यांचं व्यक्तिमत्त्व सर्वव्यापी आहे.

तर प्रियांका मुख्यमंत्रिपदाच्या दावेदार

आज उत्तर प्रदेशात मुसलमान, ब्राह्मण आणि दलित मतदारांचा मायावतींकडून मुखभंग झाला आहे. मायावती अघोषित रूपाने किंवा कोणत्या तरी दबावामुळे भारतीय जनता पक्षाला मदत करत आहेत, ही लोकधारणा दृढ बनत चाललीय. मुस्लिम समुदायाचा विचार करता अखिलेश यादव हे भाजपचा पराभव करण्यास समर्थ आहेत, असं वाटलं तरच पश्चिम आणि मध्य उत्तर प्रदेशात त्यांच्या पारड्यात मतं टाकतील, पण अखिलेश यांच्या पक्षाला फारसं यश मिळालं नाही तर सलमान खुर्शिद यांनी म्हटल्यानुसार प्रियांका गांधी या मुख्यमंत्रिपदाच्या दावेदार म्हणून पुढे येऊ शकतात. कदाचित यामधे त्यांना यश मिळणार नाही; पण ४०० जागांपैकी १०० जागांवर काँग्रेस गांभीर्याने लढली आणि त्यातल्या ३० ते ३५ टक्के जागांवर जरी यश मिळालं तरी राजकारणाची दिशा वेगळी होऊ शकते. आज उत्तर प्रदेश विधानसभेत काँग्रेसकडे अवघ्या ७ जागा आहेत.

काँग्रेसचा शेवटचा डाव

लोकसभा किंवा विधानसभांच्या निवडणुकांमधे एखादा चेहरा पुढे आणून त्याची प्रतिमा ठसवून निवडणुका लढण्याचा प्रघात भारतीय जनता पक्षाने नव्याने पुढे आणला. काँग्रेस पक्षात या प्रकारच्या राजकारणाबाबत एकमत नाहीये. आजही जुन्या किंवा पारंपरिक पद्धतीनेच निवडणुका लढण्याच्या मानसिकतेतच काँग्रेस आहे; पण प्रियांका गांधींबाबत पक्षाची भूमिका वेगळी आहे. प्रियांकांचा चेहरा पुढे केला तर कार्यकर्त्यांमधे नवा उत्साह दाटून येईल, पक्षाला आलेली मरगळ दूर होईल अशी काँग्रेसजनांची धारणा आहे. २००७, २०१२ आणि २०१७ च्या विधानसभा निवडणुकांमधे काँग्रेसकडून राहुल गांधी यांना उत्तर प्रदेशच्या राजकारणात सक्रिय करण्याचे प्रयत्न झाले; पण राहुल यांनी नेहमी यापासून पळ काढला. याचा परिणाम म्हणजे त्यांना अमेठीची लोकसभेची हक्काची जागही वाचवता आली नाही. राहुल आणि प्रियांका हे बहीण-भाऊ असले तरी त्या दोघांचे राजकीय विचार, कार्यशैली, कार्यपद्धती यामधे बराच फरक आहे. प्रियांका गांधी या राहुल यांच्यापेक्षा सरस असल्यामुळेच काँग्रेसने त्यांच्या रूपाने शेवटचा डाव खेळला आहे, असं म्हणता येईल. ■

कॅनडा निवडणुकीत भारतीयाचा बोलबाला

कॅनडामधे २० सप्टेंबरला मध्यावधी निवडणुका झाल्या. पंतप्रधान जस्टीन ट्रुडो यांच्यासाठी निवडणुकीचा निर्णय आत्मघातकी ठरेल असं म्हटलं जातंय. या निवडणुकीच्या प्रचार काळात सगळ्यात जास्त चर्चा झाली ती भारतीय वंशाच्या जगमीत सिंह यांची. सगळीकडे त्यांचाच बोलबाला होता. त्यामुळेच प्रत्यक्ष निकाल लागतील तेव्हा जगमीत सिंह किंगमेकरच्या भूमिकेत असतील असं म्हटलं जातंय.

राजकारण

अक्षय शारदा शरद

जगभरातल्या श्रीमंत देशांच्या यादीत कॅनडाचं नाव घेतलं जातं. संसदीय लोकशाही असलेल्या या देशात सध्या निवडणुकीची धामधूम सुरू आहे. कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रुडो यांनी १५ ऑगस्टला मुदतपूर्व निवडणुका जाहीर केल्या. २० सप्टेंबरला तिथं प्रत्यक्ष निवडणूक झाली. लवकरच नवं सरकारही येईल. याआधी २०१९ ला जस्टीन ट्रुडो यांच्या नेतृत्वातल्या लिबरल पार्टीला 'हाऊस ऑफ कॉमन्स'च्या निवडणुकीत म्हणजेच तिथल्या कनिष्ठ सभागृहात १५७ जागा मिळाल्या. तडजोडी झाल्या. आघाडीचं सरकार सत्तेवर आलं. कोणताही कायदा पास करायचं म्हटलं की ट्रुडो यांचं टेन्शन वाढत होतं. प्रत्येकवेळी इतर पक्षांवर अवलंबून राहणं ट्रुडो यांच्यासाठी डोकेदुखीचं ठरायला लागलं. दुसरीकडे कोरोना काळातली परिस्थिती हाताळण्यात आलेलं अपयश ट्रुडो यांना अडचणीत आणत होतं. विरोधी पक्ष त्यांच्यावर टीकेची झोड उठवत होते. त्यामुळे त्यांनी मध्यावधी निवडणुकीची घोषणा केली.

एक निवडणूक, १२ मुद्दे

व्हँकूवर सन हा कॅनडातला एक प्रतिष्ठित न्यूजपेपर आहे. कॅनडातल्या निवडणूक काळातल्या मुद्द्यांची चर्चा या न्यूजपेपरमधल्या एका लेखात वाचायला मिळते. त्यांच्या मते १२ महत्वाचे मुद्दे होते जे निवडणूक काळात केंद्रस्थानी ठेवून त्यावर वाद, चर्चा झाली. कॅनडातल्या प्रमुख राजकीय पक्षांनी या मुद्द्यांवर आपली भूमिका मांडली. त्यावर मतं मागितली गेली. ट्रुडो सरकारला देशातल्या कोरोनाच्या परिस्थितीवरून धारेवर धरलं गेलं. निवडणूक प्रचार काळात पक्षांनी घरांच्या परवडणाऱ्या किंमतीचं आश्वासन दिलं. तसंच रोजगाराचा मुद्दाही चर्चेत राहिल्याचं व्हँकूवर सननं म्हटलंय. त्यासोबतीला आरोग्य, ऊर्जा, हवामान बदल, अर्थव्यवस्था, लहान मुलांचं आरोग्य, स्थलांतर अशा मूलभूत विषयांवर तिथल्या राजकीय पक्षांमधे घमासान चर्चा झाली. कॅनडात बहुपक्षीय पद्धती असून देशात लिबरल पार्टी ऑफ कॅनडा आणि कंझर्वेटिव पार्टी ऑफ कॅनडा हे दोन प्रमुख पक्ष आहेत. त्यासोबतच ब्लॉक क्यूबोकॉइस, न्यू डेमोक्रॅटिक आणि ग्रीन पार्टी या पक्षांसोबत इतर काही अपक्ष उमेदवारही निवडणुकीच्या रिंगणात उभे असतात. निवडणूक प्रचार काळात या पक्षांमधे या १२ मुद्द्यांवर चर्चा झाल्याचं व्हँकूवर सननं म्हटलंय.

जस्टीन ट्रुडोंच्या विरोधात नाराजी

जस्टीन ट्रुडो २०१५ ला पहिल्यांदा कॅनडाचे पंतप्रधान झाले. त्यानंतर २०१९ ला पुन्हा सत्तेत आले. या निवडणुकीत त्यांच्या नेतृत्वातल्या लिबरल पार्टीला ३३८ पैकी १५७ जागा मिळाल्या होत्या. त्यावेळी ट्रुडो यांनी अल्पमतातलं सरकार बनवलं होतं.

एक दशकभर कॅनडाच्या सत्तेवर राहिलेल्या स्टीफन हार्पर यांना हरवून ट्रुडो २०१५ ला पहिल्यांदा सत्तेत आले. तेव्हा त्यांनी हवामान बदल, महिलांचे अधिकार असे काही मूलभूत मुद्दे मांडले होते. याच मुद्द्यांमुळे ते लोकप्रिय ठरले. त्यांच्या नावाची चर्चा होऊ लागली. शेवटी त्यांनी सत्तेचा सोपान गाठला. यावेळी कॅनडात कोरोनाची चौथी लाट आली असताना ट्रुडो यांनी मध्यावधी निवडणुकांची घोषणा करणं हे आत्मघातकी असल्याचं तिथल्या राजकीय विश्लेषकांचं म्हणणं आहे. कोरोनाची परिस्थिती हाताळण्यात आलेलं अपयश हेही त्यामागचं एक कारण होतं. या मुद्द्यावरून ट्रुडो यांच्याविरोधात लोकांच्या मनात मोठ्या प्रमाणात असंतोष असल्याचं वेगवेगळ्या मत चाचण्यांमधून दिसतंय.

विरोधी पक्षांचा बोलबाला

कंझर्वेटिव हा कॅनडातला उजव्या विचारांचा पक्ष आहे तसंच तिथला प्रमुख विरोधी पक्षही. एरिन ओ टूल हे या पक्षाचे नेते आहेत. निवडणूक निकालानंतर लोकांच्या नाराजीचा फायदा त्यांच्या नेतृत्वातल्या कंझर्वेटिव पक्षाला होतो का ते पहावं लागेल. टूल यांनी निवडणूक प्रचार काळात कोरोनाचं देशव्यापी लसीकरण आणि त्याचवेळी सरकारी कर्मचाऱ्यांच्या अनिवार्य लसीकरणाला विरोध हे मुद्दे प्रकर्षाने मांडलेत. 'ब्लँचेट ब्लॉक क्यूबोकॉइस' हा पक्ष कॅनडातला सगळ्यात मोठा भाग असलेल्या क्यूबेक इथंच आपले उमेदवार देत असतो. क्यूबेक हा फ्रेंच भाषिक भाग आहे. त्यामुळे या भाषेच्या आणि भागाच्या अस्मितेचा मुद्दा हा पक्ष मांडत असतो. या पक्षांचं नेतृत्व वेइस फ्रँकोइस करतात. नवीन स्थलांतरित लोकांना कॅनेडियन नागरिकत्व द्यायच्या आधी त्यांना फ्रेंच भाषा येणं अनिवार्य असायला हवं अशी त्यांच्या पक्षाची अधिकृत भूमिका आहे. एनामी पॉल या महिलेकडे मागच्या वर्षी कॅनडातल्या ग्रीन पक्षाचं नेतृत्व आलं. पॉल या ग्रीन पक्षाचं नेतृत्व करणाऱ्या पहिल्या कृष्णवर्णीय कॅनेडियन आणि ज्यू महिला आहेत. २०१९ ला झालेल्या निवडणुकीत ग्रीन पक्षाने ३ जागा जिंकल्या होत्या. पर्यावरण हा मुद्दा घेऊन ग्रीन पक्ष कॅनडात निवडणूक लढवत असतो.

निवडणुकीचं भारतीय कनेक्शन

कॅनडाच्या एकूण लोकसंख्येच्या ४ टक्के लोक हे भारतीय वंशाचे आहेत. त्यातले जवळपास ५ लाख हे शीख समाजाचे नागरिक आहेत. खलिस्तानी समर्थकांबद्दलचं जस्टीन ट्रुडो यांचं मवाळ धोरण अनेकदा वादाच्या भोवऱ्यात सापडलं होतं. २०१८ मधे ट्रुडो भारतात आले होते. त्यावेळी त्यांनी इथल्या स्वर्ण मंदिराला भेटही दिली होती. तेव्हा तो त्यांच्या निवडणूक स्ट्रॅटेजीचा हा भाग समजला गेला. कॅनडाच्या हाऊस ऑफ कॉमन्समधे सध्या ३३८ सदस्य आहेत. त्यापैकी २२ सदस्य हे मूळ भारतीय वंशाचे आहेत. तर त्यातले १८ खासदार हे शीख समाजातून येतात. मूळ भारतीय वंशाच्या खासदारांपैकी ३ जणांना कॅनडाच्या कॅबिनेटमधे स्थान मिळालंय. सध्याच्या निवडणुकीतही या भारतीय-कॅनेडियन उमेदवारांचा बोलबाला दिसून येतोय. सगळ्याच पक्षांनी त्यांना कमी अधिक प्रमाणात उमेदवारी दिलीय. ज्यात लिबरल पक्षाकडून १७, कंझर्वेटिवने १३, न्यू डेमोक्रॅटिक पक्षाकडून १० तर ग्रीन पक्ष आणि पीपल पार्टी ऑफ कॅनडा या पक्षांनी प्रत्येक ५ भारतीय-कॅनेडियन उमेदवारांना निवडणुकीच्या मैदानात उतरवलंय. ■

जयसिंग सोळंकेंच्या झंझावाती दौऱ्याला प्रतिसाद

१९ गावांसाठी १ कोटींवर निधी आणला खेचून

माजलगाव : राष्ट्रवादीचे युवा नेते तथा बीड जिल्हा परिषदेचे बांधकाम व अर्थ सभापती जयसिंग सोळंके यांनी माजलगाव तालुक्यात विकास कामांचा धडाका सुरू केला असून भूमिपूजन आणि विकास शुभारंभ सोहळ्यानिमित्त त्यांच्या झंझावाती दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. दरम्यान, १९ गावांमध्ये विविध विकास कामांसाठी एक कोटी १४ लक्ष रूपयांचा निधी खेचून आला आहे. या गावांमध्ये मुलभूत सुविधा सुरू होणार असल्याने ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

माजलगाव तालुक्यातील अनेक गावांना सिमेंट कॉंक्रेट रस्ते, नाल्यांची बांधकामे यासह विविध विकास कामांसाठी २५-१५ योजनेतुन निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या विविध विकास कामांचा दि. २१, २२ सप्टेंबर रोजी शुभारंभ करण्यात आला. यात माजलगाव तालुक्यातील केसापुरी येथे ५ लक्ष रूपये, फुलेपिंपळगाव येथे १३ लक्ष रूपये, ब्रह्मगाव येथे ५ लक्ष रूपये, सिद्धेश्वरनगर येथे ५ लक्ष रूपये, कल्याणनगर येथे ५ लक्ष रूपये, छोटेवाडी येथे ५ लक्ष रूपये, मोठेवाडी येथे ५ लक्ष रूपये, गंगामसला येथे ५ लक्ष रूपये, रोषणपुरी ५ लक्ष रूपये, नागडगाव ५ लक्ष रूपये, मोगरा येथे ८ लक्ष रूपये, केसापुरी वसाहत येथे ५ लक्ष रूपये, पायतळवाडी ५ लक्ष रूपये, देवखेडा येथे ५ लक्ष रूपये, ढोरगाव येथे ५ लक्ष रूपये, राजेवाडी येथे ५ लक्ष रूपये, देवळा येथे ५ लक्ष रूपये, बेलुरा येथे ५ लक्ष रूपये, वांगी येथे १३ लक्ष रूपये अशा एकूण १९ गावांमध्ये मूलभूत सुविधा २५-१५ योजने अंतर्गत सिमेंट रस्ते व नाल्यांची बांधकामे या विविध विकास कामांसाठी अंदाजे एकूण एक कोटी १४ लक्ष रूपये निधी देण्यात आलेला आहे. या विविध विकास कामांचा शुभारंभ बीड जिल्हा परिषदेचे सभापती जयसिंग सोळंके यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी सभापती कल्याण आबूज, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष रमेश सोळंके, विश्वांभर थावरे, ॲड.प्रमोद तौर, जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत शेजुळ, प्रा.प्रकाश गवते, पंचायत समितीचे सभापती भागवतराव खुळे, पंचायत समितीचे उपसभापती डॉ.वसिम मनसबदार, सदस्य जयदत्त नरवडे, सुशिल साळुंके, शशांक सोळंके, शिवाजी डाके, इंद्रजित वानखेडे, बालासाहेब फपाळ आदींसह ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते.

जयसिंग सोळंके यांनी जाणून घेतल्या ग्रामस्थांच्या व्यथा

माजलगाव तालुक्यात विविध गावांमध्ये मुलभूत समस्या सोडविण्यासाठी याहीपेक्षा मोठा निधी खेचून आणू, अशी ग्वाही बीड जिल्हा परिषदेचे सभापती जयसिंग सोळंके यांनी दिली. या दौऱ्यानिमित्त सोळंके यांनी ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. १९ गावांमधील दौऱ्याला मोठा प्रतिसाद मिळाला.

शिक्षणाबरोबरच सुसंस्कारही गरजेचे

गटविकास अधिकारी प्रज्ञा माने यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी

माजलगाव : सध्याचे युग हे प्रचंड स्पर्धेचे असल्याने या युगात टिकून राहण्यासाठी अपार मेहनत, खूप जिद्द, दुर्दम्य आत्मविश्वास विद्यार्थ्यांनी अंगीकारणे गरजेचे आहे. विद्यार्थीदशेत हुशार असणे आवश्यक आहे. विद्यार्थी दशेतील पहिले २५ वर्ष अभ्यास करून उर्वरीत आयुष्यात सुखी व्हायचे की विद्यार्थीदशेत मौजमजा करून उर्वरीत आयुष्य कष्टमय घालवायचे हे सर्वस्वी पाल्यांच्या हाती आहे. भारताच्या उज्वल भविष्यासाठी विद्यार्थी हुशार अन् सुसंस्कारीत पिढी घडणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन गटविकास अधिकारी प्रज्ञा माने-भोसले यांनी केले. त्या शुक्रवारी दि.२४ सप्टेंबर रोजी रविदास सभागृह येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या २७ व्या दिनानिमित्त आयोजित गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळयात अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या.

याप्रसंगी मंचावर राज्यप्रवक्ते रोहिदास बनसोडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे, नानासाहेब घोडके, सत्कारमूर्ती डॉ.अजित जगधने, भाजपा नेते सत्यनारायण उणवणे, शिवसेना नेते सुनिल खंडागळे, राष्ट्रवादीचे नेते सुनिल शिंदे, राजेश जाधव यांची उपस्थिती होती. यावेळी हरकी निमगाव येथील डॉ.अजित नवनाथराव जगधने यांनी एमबीबीएस एमडी मेडीसीन पदवी संपादन केल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. पुढे बोलताना माने म्हणाल्या, एमपीएससी सारखी परीक्षा देवून आपण अधिकारी होवू शकतात. जिद्दीने अभ्यास करणारा विद्यार्थी या परीक्षेत यशस्वी होउ शकतो. चारित्र्यवान विद्यार्थी निर्माण होणे काळाची गरज आहे. राज्यप्रवक्ते रोहीदास बनसोडे बोलतांना म्हणाले, संत रविदासाना अभिप्रेत असलेला समाज घडण्यासाठी महापुरूषांचे विचार आंगीकारून त्याप्रमाणे विद्यार्थीदशेत कार्य करणे गरजेचे आहे. शिक्षणाची ज्ञानगंगा बहुजनांच्या घराघरात पोहोचवणाऱ्या महापुरूषांचे विचार अंमलात आणणे गरजेचे आहेत. सामान्य माणसाचे प्रश्न सोडविण्यासाठी माजी समाजकल्याण मंत्री बबनराव घोलप यांनी राष्ट्रीय चर्मकार महासंघाची १९९५ साली स्थापना केली. अनेकविविध प्रश्नांची सोडवणूक राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या माध्यमातून झाली आहे. वंचितांचा बुलंद आवाज बनून संघटनेने काम केले आहे. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे बोलतांना म्हणाले, मला बारावीला ५२ टक्के गुण होते. बीएला ॲडमिशन घेतले पण पहिल्याच वर्षी नापास झालो. मनात अभ्यासाची ज्योत पेटली अन पोलीस कॉन्स्टेबल आसतांना एमपीएससीची परीक्षा दिली. पहिल्या प्रयत्नात यशस्वी झालो. शिक्षणाला वयाचे बंधन नाही. विवाहानंतर दोन अपत्यानंतर मी एमपीएससी परीक्षा दिली त्यात यशस्वी झालो. मनात जिद्द निर्माण होणे आवश्यक आहे. यावेळी नानासाहेब घोडके, डॉ.अजित जगधने यांची समायोचित भाषणे झाली. महापुरूषांच्या प्रतिमा पूजनाने व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. एलसीबीचे डीवायएसपी भारत राऊत यांनी भ्रमणध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन अशोक वाडेकर यांनी करतांना डॉ.अजित जगधने यांचा संघर्षमय प्रवास समाजासमोर मांडला. आभार सुभाष कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नानासाहेब घोडके, राजेश जाधव, रमेश जगताप, अशोक वाडेकर, सुभाष कांबळे, राधाकिसन भाळशंकर, प्रसाद वाघमोडे, ॲड दत्ता जाधव ,बंडू सोनवणे ,अश्विण खंडागळे, विनोद सोनवणे, सचिन वाघमारे यांनी परीश्रम केले. याप्रसंगी सोनीमोहाचे नूतन सरपंच आश्रुबा गोरे व भाजपा सोशल मिडीया तालुकाप्रमुख विकास गोरे यांना सन्मानित करण्यात आले. एमबीबीएस, दहावी व बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देवून मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला मधुकर ठोसर, किसनराव गायकवाड, मोहनराव त्रिमुखे, बाबासाहेब सवणे, पद्माकर कांबळे, बंडू गवळी, ज्योती वाघमारे, विजयमाला वाडेकर, संतोष जाधव, तुकाराम जगधने, नवनाथ जगधने, प्रयागा जगधने, ज्योतिराम जगधने, भागवत जगधने, हेमा जगधने, बंडू सोनवळे, सुभाष हिंजुर्डे आदींच उपस्थिती होती.

'श्री मंगलनाथ'ला चंद्रशेखर महाराजांची भेट

माजलगाव : येथील श्री मंगलनाथ मल्टीस्टेटच्या मार्केटयार्ड शाखेच्या नवीन वास्तू स्थलांतरप्रसंगी चंद्रशेखर शिवाचार्य माजलगावकर महाराज यांचे शुभआशीर्वाद घेताना संस्थेचे अध्यक्ष आर.जी.कानडे, मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र कानडे.

'धुनकेश्वर'चे शिवराज यादव यांचा सन्मान

माजलगाव : येथील धुनकेश्वर अर्बनच्या वर्धापनदिनानिमित्त चेअरमन शिवराज यादव यांचा सन्मान करताना ज्येष्ठ पत्रकार बाबा श्रीहरी देशमाने, ज्ञानेश्वर यादव, सामाजिक कार्यकर्ते दीपक गडसिंग.

रोटरी क्लबतर्फे व्यवसायिकांना 'आश्रय'

प्रतिनिधी

माजलगाव : रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीच्या वतीने रविवार दि.२६ सप्टेंबर रोजी अतिशय मोठ्या अशा १२ आश्रय छत्रीच्या वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. रस्त्यावर वेगवेगळ्या ठिकाणी ऊन-वारा पाऊस सोसत हातावरचा छोटा उद्योग करणारे गरीब व्यावसायिक त्यात चर्मकार बांधव, फूल विक्रेते, भाजी विक्रीते फळ विक्रेते, रस्त्यावर रोज छोटे मोठे दुकान टाकून आपला अतिशय छोटा असा व्यवसाय करणाऱ्या गरीब व्यवसायिकांना आश्रय छत्री वाटपाचा अभिनव असा कार्यक्रम रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीच्या वतीने घेण्यात आला.

या कार्यक्रमाला रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ.प्रशांत पाटील, प्रोजेक्ट चेअरमन शशिकिरण गडम, माजलगाव नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा रोटरी मेंबर विशाल भोसले, जय महेश साखर कारखान्याचे एम.डी.रोटरीयन गिरीश लोखंडे, डॉ.स्वानंद कुलकर्णी, लक्ष्मीनारायण मुंदडा, राहूल लंगडे, सुरेश भानप डॉ.अंजली अकोलकर, सुरेखा गवळी, शोभाताई वर्मा आरेफ शेख, संदीप गुंडेवार, राजेश देशपांडे, रविंद्र कानडे, गणेश गवारे, विनायक रत्नपारखी व अनेक रोटरी मेंबर उपस्थित होते. या कार्यक्रमास वेगवेगळ्या ठिकाणी अनेक मान्यवरांनी भेट दिली. त्यात माजी नगराध्यक्ष नासेर खान पठाण, माजी नगराध्यक्ष डॉ.अशोक तिडके, नगरसेवक दीपकराव मेंडके माजी नगरसेवक भारतराव होके, माधव सोनवणे, पत्रकार दिलीप झगडे, पत्रकार राज गायकवाड, पत्रकार वैजनाथ घायतिडक यांनीही आवर्जून भेट दिली. रोटरीच्या या उपक्रमाचे नागरिकांनी कौतुक केले.

महसूल उपायुक्तांकडून पिकांची पाहणी

प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील पिकांचे नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे अतोनात नुकसान झाले असून, गुरुवारी महसूल उपायुक्त पराग सोमण यांनी तालुक्यातील नुकसानग्रस्त गावांचा दौरा करून पिकांची पाहणी केली.

पंधरा दिवसांपूर्वी झालेल्या तुफानी वृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या तोंडातील घास हिरावून नेला. शेतातील उभ्या पिकांचे पाण्यामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. या नुकसानीची पाहणी करण्याचे शासन स्तरावर आदेश असल्याने गुरूवारी औरंगाबाद येथून महसूल-उपायुक्त पराग सोमण यांनी माजलगाव तालुक्याचा दौरा केला. केसापुरी, पात्रुड, नित्रुड आदी गावांतील शेतांतील सोयाबीन, कापूस, ऊस व तूर या पिकांची त्यांनी पाहणी केली. यावेळी त्यांना सोयाबीनला फुले आलेली, कापूस सडलेला, तूर, बाजरी, तीळ ओंबाळून गेलेली तसेच या पिकांमध्ये अद्यापही पाणी साचलेले दिसून आले. शेतकऱ्यांचे हे नुकसान मोठे झाल्याने याविषयीचा अहवाल ते शासनाकडे सोपविणार आहेत. यावेळी त्यांच्यासमवेत उपविभागीय अधिकारी निलम बाफना, मंडळ अधिकारी पद्माकर मुळाटे, तलाठी मडकर, केसापुरीचे माजी सरपंच विलास साळवे, कांता पवार, सगीर देशमुख, मुंजाबा साबळे, अनिल फुलारी, विठ्ठल साबळे, महादेव जाधव व सचिन लहाडे यांच्यासह शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

प्रो.प्रा.अतिक भाई
9011125332
हॉटेल विसावा धाबा
कंदुरीचा रस्सा लागतो कसा? चाखायचा असेल तर, विसावा वर बसा...!
स्पेशल कंदुरी मटन, दम बिर्याणी मिळेल.
तेलगाव-माजलगाव रोड,नित्रुड ता.माजलगाव जि.बीड

जिजांनी झुलवत ठेवले; दादांचे आश्वासन हवेत विरले

चाटगावकरांच्या रस्त्याची दैना काही फिटेना



छायाचित्रे : रमेश तिडके

प्रतिनिधी

धारूर : माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे तत्कालिन आमदार आर.टी.देशमुख यांनी वाऱ्यावर सोडले तर विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांचे आश्वासन हवेत विरले. चाटगावकरांच्या रस्त्याची दैना काही फिटेना, आता रस्त्यासाठी भाजपा युवा नेते बालासाहेब केकान उग्र आंदोलनाच्या तयारीत असून शेकडो ग्रामस्थांना घेवून लवकरच बीड-परळी महामार्गावर चक्काजाम करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

धारूर तालुक्यातील चाटगाव जोडरस्त्याची दयनीय अवस्था झाली असून कित्येक वर्षापासून रस्त्याच्या दुरूस्तीकडे लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केलेले दिसते. बीड-परळी महामार्गालगत चाटगाव जोडरस्त्याची दुरूस्ती करू, असे अनेकदा तत्कालिन आमदार आर.टी.देशमुख यांनी आश्वासने दिली. मात्र देशमुख यांचा आमदारकीचा कार्यकाळ संपला तरी चाटगावकरांच्या रस्त्याचा प्रश्न मार्गी लागला नाही. याबाबत आर.टी.देशमुख यांना चाटगाव दौऱ्यात ग्रामस्थांनी संतप्त होवून प्रश्न विचारले. तरी त्यानंतरही देशमुख यांनी चाटगावकरांना रस्त्याच्या दुरूस्तीबाबत झुलवत ठेवले.



भाजप युवा नेते बालासाहेब केकान आंदोलनाच्या तयारीत

त्यानंतर प्रकाश सोळंके आमदार म्हणून निवडून आले. सोळंके यांनाही ग्रामस्थांनी चाटगावच्या जोडरस्ता दुरूस्तीबाबत विचारणा केली. मात्र सोळंकेंचे आश्वासनही हवेतच विरले, अशी अवस्था निर्माण झाली. अगोदर तत्कालिन आमदार आर.टी.देशमुख यांनी झुलवत ठेवले आणि विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांचे आश्वासन हवेत विरले या प्रकारामुळे चाटगावकर संताप व्यक्त करत आहेत. गेली कित्येक वर्ष चाटगाव जोडरस्त्याच्या दुरूस्तीचे काम रखडल्याने वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे. अनेक ठिकाणी मोठ-मोठी खड्डे पडल्याने त्यात पाणी साचले आहे. हा रस्ता म्हणजे पाण्याचे डबके झाले आहे. या रस्त्यावरून दिंद्रुड आणि तेलगावला दररोज शेकडो वाहनधारक जातात. शाळेला जाणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थीनींना याच रस्त्यावरून चाटगाव फाट्यावर पायी चालत जावे लागते. याकडेही संबंधितांनी लक्ष घालून चाटगाव जोडरस्त्याच्या दुरूस्तीचे काम हाती घ्यावे अशी मागणी भाजपा युवा नेते बालासाहेब केकान यांनी केली आहे. येत्या काही दिवसात रस्ता दुरूस्तीचे काम हाती घेतले नाही तर शेकडो ग्रामस्थांना बरोबर घेवून मोठे जनआंदोलन उभारणार असल्याचेही बालासाहेब केकान यांनी वर्तमानशी बोलताना सांगितले.

आंदोलन मागे घ्या, केकान यांना 'सरकारी' सल्ला

चाटगाव रस्ता दुरूस्तीबाबत आंदोलनाचा इशारा देताच जिल्हा परिषद उपविभाग माजलगावच्या उपअभियंत्यांनी थातुरमातूर पत्र पाठवून चाटगाव डांबरीकरण रस्त्याच्या दुरूस्तीचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमधून मंजूर झाल्याचे कळविले आहे. मात्र आंदोलन करू नये असा सरकारी सल्ला दिला आहे. दरम्यान, आपण आंदोलनावर ठाम असल्याचे बालासाहेब केकान यांनी कळविले आहे.

आता उग्र आंदोलनाशिवाय पर्याय नाही : दीपक गडसिंग

बीड-परुळी महामार्गालगत असलेल्या चाटगाव जोडरस्त्याच्या दुरूस्तीचे काम गेली कित्येक वर्ष रखडलेले आहे या प्रश्नी ग्रामस्थांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी अनेकवेळा निवेदने दिली, आंदोलनाचा इशारा दिला. मात्र याचा कसलाच परिणाम राजकारण्यांना झाला नाही. आता उग्र आंदोलनाशिवाय पर्याय नाही. असा इशारा सामाजिक कार्यकर्ते दीपक गडसिंग यांनी दिला आहे.

बससेवा का बंद झाली?

चाटगाव जोडरस्त्याच्या दुरूस्तीचा प्रश्न जसा अनुत्तरीत आहे. तसा येथील बससेवा बंद का झाली. याचे कोडे अद्याप चाटगावकरांना उलगडलेले नाही. चाटगाव बससेवा सुरू करण्यासाठी डॉ.मारोती सांगळे आणि पोलीस शंकर सांगळे यांनी परिश्रम घेतले होते. त्यांच्या प्रयत्नांमुळेच चाटगाव बस सुरू झाली होती. आता बससेवेसाठीही पाठपुरावा करण्याची गरज असल्याच्या प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी वर्तमानकडे नोंदविल्या आहेत.

सद्गुरु श्रीमिस्कीन स्वामी मठात शारदीय नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी

मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांची माहिती

प्रतिनिधी

माजलगाव : प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही माजलगाव येथील सद्गुरू श्री मिस्कीनस्वामी मठ संस्थान येथे शारदीय नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.७ ते १५ ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या सोहळ्याची सांगता दि.१५ ऑक्टोबर रोजी पालखी सोहळा आणि दसरा दरबाराने होणार असल्याची माहिती मठ संस्थानच्या वतीने नवरात्र महोत्सव समितीकडून देण्यात आली.

संस्थान मठामध्ये साजरा होणारा हा शारदीय नवरात्र महोत्सव सोहळा सर्व शासकीय नियमांच्या अधिन राहून भक्तांना साजरा करावा अशी सूचना माजलगाव मठाचे नूतन मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी केली आहे. दरम्यान, दि. १६ ऑक्टोबर रोजी केदार महापीठाचे जगद्गुरू श्री.श्री.श्री.१००८ भिमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजींच्या सानिध्यामध्ये माजलगाव मठाचे पूर्वाचार्य लिंगैक्य श्री.ष.ब्र.१०८ तपोरत्नं प्रभु पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांचा गणाराधना कार्यक्रम देखिल होणार असल्याचे संबधीतांकडून सांगण्यात आले. दि.२१ सप्टेंबर रोजी वरील विषयाच्या अनुषंगाने मठाचे विद्यमान आचार्य श्रीगुरू ष.ब्र.१०८ चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांचे नेतृत्व आणि अध्यक्षतेखाली समाज बांधवांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीमध्ये शारदीय नवरात्र महोत्सवाची रूपरेषा ठरविण्यात आली. यावेळी उपस्थित रहावे असे आवाहन शारदीय नवरात्र महोत्सव समितीचे अध्यक्ष बबनअप्पा खुर्पे, उपाध्यक्ष विलासअप्पा लांडगे, कार्याध्यक्ष ओंकारअप्पा खुर्पे, कोषाध्यक्ष सुचेंद्र महाजन यांच्यासह कार्यकारी मंडळाने केले आहे.

'वैभवशाली' माजलगावच्या विश्रामगृहाला अवकळा

प्रतिनिधी

माजलगाव : एकेकाळी माजलगाव शहराचे वैभव असणाऱ्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या येथील शासकीय विश्रामगृहास अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे अवकळा आली आहे.

सार्वजनिक बांधकाम खात्याच्या येथील शासकीय विश्रामगृह म्हणजे एकेकाळी वैभवशाली होते. टूमदार इमारत, समोर बागबगीचा, चांगली आसनव्यवस्था, उत्तम भोजनाची व्यवस्था, हॉल, दोन बेडरूम अशा सर्व सोयी-सुविधा येथे उपलब्ध असल्याने सतत मंत्री, अधिकारी, न्यायदंडाधिकारी यांच्यासह राजकीय, सामाजिक क्षेत्राशी संबंधितांचा विश्रामगृहावर राबता असायचा. त्यादृष्टीने काही वर्षापूर्वी नूतनीकरणही करण्यात आले होते. मात्र, त्याची पाहिजे तशी निगा राखली जात नाही. खात्याचे विश्रामगृहाची जबाबदारी असलेले अभियंता येथे कधीच टिकत नसल्याने दुर्लक्षित ठिकाण बनले आहे.

माजलगावात काँग्रेसकडून आनंदोत्सव

माजलगाव : काँग्रेसच्या जेष्ठ नेत्या रजनी पाटील यांची राज्यसभा खासदार म्हणून बिनविरोध निवड झाल्यानंतर माजलगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात काँग्रेसतर्फे फटाके फोडून आनंदोत्सव साजरा करताना नारायण होके पाटील, रशिद शेख, दत्ता कांबळे, अ‍ॅड.एम.एच.ईनामदार आदींसह काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

खोलेश्वर मल्टीस्टेट
विश्वासाचं शतकपार
100
कोटींचा टप्पा पूर्ण
ठेवीदार व सभासदांचे मनपूर्वक आभार !
+91 95 04 100 111
ho.kholeshwarmultistate@gmail.com
Follow Us

SANTOSH NAIKWADE & ASSOCIATES
(For Individual and Businesses)
Tax Time Made Simple !
✓ Income Tax Return
✓ GST Registration
✓ GST Return
✓ SSI Registration
✓ Shop act registration
✓ Udyam Aadhar registration
✓ Company Registration
✓ T.D.S.
✓ Project Report
✓ P.F. E.S.I.C. Registration
✓ Bank Loan
SANTOSH M. NAIKWADE
9503022995
Plot No.RX 06/01, Shiv Tirth Vihar, Mohata Devi Chowk,
Bajaj Nagar, MIDC Area Waluj Aurangabad-431136

तीन दगडांच्या आधाराला
मातीनं दिलेली साथ म्हणजे चुल...
लाल बुंद निखाऱ्यावर
खरपुस भाजलेली भाकर म्हणजे चुल...
तापलेल्या पातेल्यातल्या रश्याला
आलेली तांबडी तर्रीऽऽऽ म्हणजे चुल...
खाल्लेल्या प्रत्येक घासातुन
आलेली गावची आठवण म्हणजे चुल...
Mo. 8788356456, 9325636641
हॉटेल चुलमटन
चुलीवरचा घरगुती रस्सा जसा हवा तसा !

SAMRAJYA
साम्राज्य
The Perfect Men's Shop
• ब्रॅण्डेड जिन्स • शर्टस् • टि-शर्टस् • फुटवेअर
स्थळ : अकोलकर हॉस्पिटल शेजारी, फपाळ कॉम्प्लेक्स, बीड रोड, माजलगाव जि.बीड

आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी**, यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.